IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# 'दलित अत्मकथा स्वरूप व संकल्पना'

**डॉ. एच. टी. माने**
प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभागप्रमुख,
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
कळंब, धाराशिव

**दळवे अतुल तानाजी**
**संशोधक विद्यार्थी,**
**मराठी विभाग,**
**वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा**

**प्रस्तावनाः**

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध वाङ्मय प्रवाह उदयास आले. त्याप्रवाहामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य आणि जनवादी साहित्य जोमाने आले. दलित साहित्याने मराठी वाङ्मयाच्या क्षितीजावर 'निळी पहाट' उमलली. कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन आणि समीक्षा इ. वाङ्मय प्रकारांतून दलित साहित्याची निर्मिती झाली. डॉ. आंबेडकर यांच्या विचार आणि कार्य दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्त्रोत आहे. सामाजिक विषमतेमुळे मराठी वाङ्मयात दलित साहित्याचे एक नवे दालन निर्माण झाले आहे. १९६७ साली 'अस्मितादर्श' हे नियतकालिक सुरू झाले आणि मराठी साहित्यात ख-या अर्थाने दलित साहित्य प्रवाहाला गती मिळाली. जेव्हा या देशातील दलितांना कोणीच वाली नव्हता तेव्हा दलित समाजाला पुशेपेक्षा हीन वागणूक दिली जात होती. अवहेलना, अत्याचार, दारिद्रय, रूढी-परंपरा, अंधश्रध्दांच्या ओझ्याखाली हा दलित समाज लाचारीचे जीवन जगत होता; परंतु महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतून दलित समाजाचा स्वाभिमान जागृत होऊन आपल्या हक्काची जाणीव झाली. शतकानुशतके वर्षे अंधारात चाचपडणा-या दलित जीवनाला डॉ. आंबेडकर या महामानवाने आत्मभानाचा प्रकाश दिला. अन्यायाचा निर्धाराने प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण केले. त्यातून दलितांमधील नवशिक्षित तरूणांनी स्वतःच्या आणि समाजाच्या व्यथा-वेदनांचा आविष्कार त्यांनी शब्दबध्द करायला प्रवृत्त झाला. त्यामध्ये दलित आत्ककथा अत्यंत प्रभावीपणे उदयास आला.

आत्मकथा हा प्रकार स्व-अनुभवाशी निगडीत आहे. हे अनुभव प्रामाणिकपणे कथन केल्यास, त्याचे वैयक्तिक जीवनानुभव, सामाजिक बांधिलकी, तत्कालीन सामाजिक स्थिती, समाजव्यवस्था, चाली-रीती याचे आकलन होते. म्हणून आत्मचरित्रातून येणारा अनुभव एका व्यक्तीचा असण्याबारोबर समिष्टीचाही असतो. आत्मकथा लेखकाचे अनुभव वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ असतील तर असे लखन परिणाम साधते. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा होत गेला. याचा अंतर्मुख होऊन लेखकाने घेतलेला स्वअस्तित्त्वाचा शोध होय. दलित आत्मकथा लेखनाचा विचार करतांना या आत्मकथनांतून संपूर्ण जीवनवृत्तावर लेखन समर्थपणे आलेले आहे. जीवनानुभव, जीवन वास्तवता, दलित मनांची सामाजिक परिवर्तनाची अपेक्षा यांचे दर्शन घडविण्यामध्ये दलित आत्मकथने यशस्वी झाली आहेत. 'अस्मितादर्शने' 'मी आणि माझे लेखन', अनुभव आठवण, मुलाखती, आम्ही असे जगलो, असे जगते अशा शीर्षकाखाली प्रकाशित केलेलया दलित लेखकांचे आत्मगत अनुभव वा आत्मकथन यांचा पन जीवनानुगामी आणि पारंपारिकतेपेक्षा वेगळा असल्यचे जाणवते. तसेच त्यातील कारण, अन्याय, अत्याचार आणि छळाच्या माध्यमातून दलितांचे जीवनानुभव जेव्हा आत्मकथनातून आले तेव्हा मराठी साहित्य विश्वाला हादरा बसला. कारण आत्मकथनातून आपल्या दरिद्री जीवनाची गाथा स्वनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ अशा दुहेरी पातळीवर व्यक्त झालेली आहे. त्यामुळे दलित आत्मकथने ही आत्मचरित्रापेक्षा वेगळी आहेत.

दलित आत्मकथनातून आत्मदर्शन, समाजदर्शन, आत्मशोध, अत्मसंघर्ष, समाजसंघर्ष असे सृजनशील द्वंद्व निर्माण होतांना दिसते. आत्मकथनांचा विचार करतांना जीवनानुभवांच्या कलात्मक, पातळीवरचा आत्मविष्कार महत्त्वाचा मानला जातो. मानव जगताना जे जे भोगलं अनुभवलं ते ग्रामाणिक आणि प्रांजळपणे मांडले. या भूमिकेतूनच आत्मकथनांचा जन्म झालेला आहे. यासंदर्भात अशोक पाटील म्हणतात. "भारतीय समाजजीवनात ज्या समाजाला संस्कृतीच्या नावाखली हिंदू समाजाने स्वतःचे दास म्हणून वागविले, त्या समाजाच्या भावनेच्या कोंडीचा पिढभान-पिढ्या मुक्या असलेल्या मनाचा, त्यांच्या वेदनांचा शुद्राविष्कार केवळ रंगजनासाठी किंवा म्हणने दलितांचे स्वकथन होय. आत्मकथन कल्पनाविलासासाठी लिहिले जात नसून त्यांनी अनुभवलेल्या भोगांची कहानी त्यांना समाज आणि वाचकाला सांगावयाची असते. तर प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात, आत्मकथनाचे स्वरूप केवळ तृप्त मनाने केलेल्या आयुष्याचा सिंहावलोकनाचे नाही. आपल्या आत ठसठसणा-या जखमांनी विव्हळ झालेल्या मनाचे अस्वस्थ मनाने केलेले कथन होय." अर्थात दलित लेखकांना भूतकाळातील आठवणींना उजाळा देतांना घायाळ होण्याचा अनुभव आला आहे. दलित आत्मकथना संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, "दलित साहित्यातला प्रांजळपणे जो प्रायः

दलित आत्मकथनातून प्रकर्षाने प्रकट झाला. त्याची मुळ शोधल्यास असे दिसते की, हा प्रांजळपणा मराठीतल्या आत्मकथनपर कथा व कादंबरी पुर्वीच सुरू झाला होता. तो प्रवाह ढसाळ, ढाले, सोनकांबळे, दया पवार अशा तरूण पीढीकडून दलितांमधल्या शंकरराव खरातांसारख्या जुन्या वयस्कर लेखकांपर्यंत उलटा गेलेला दिसतो. जुन्या पिढींना या पिढीचं अनुकरण करण्याचा विचित्र प्रकार दलितांमध्ये दिसून आला याच कारण आत्मकथनात्मक प्रांजाळपणा हे वाङ्मयीन कथनाच एक रूप असून ते नव्या पिढीनं शोधलेलं आहे." यातुन दलित आत्मकथनांचे सामर्थ्य या विवेचनातून अधिक स्पष्ट होते तर वामन निंबाळकर म्हणतात की, "दलित आत्मकथा म्हणजे दलितांच्या वेदनांचे आलेख आहेत."

प्रा. वा.ल. कुलकर्णी यांनी दलित आत्मपर लेखनांसंबंधी म्हटले आहे की, "जीवनाच्या साधारण अर्ध्या टप्प्यावर येता जे जीवन आपण आजपर्यंत जगलो त्याकडे प्रश्नांकीत मुद्रेने वळून पाहणारा आत्मचरित्रकार आणि शेवटीच्या दिवसात आपल्या जीवनाचे सिहावलोकन करू पाहणारा पुर्वीचा आत्मचरित्रकार यांच्या वृत्तीत फरक आहे. जीवनाचा निरोप घतांना शेवटची निरवा-निरव करून आणि आपल्या आयुष्याचा जमाखर्च सादर करून एकजण जातो, तर दुसरा जीवनाच्या ऐन माध्यावर थांबून आपण आजपर्यंत जो प्रवास केला त्याकडे डोळे भरून पाहण्याचा व त्याद्वारा आपण खरोखर कोण आहोत? हे पुढील प्रवासाच्या दृष्टीने जाणून प्रयत्न करीत आहोत. म्हणूनच ही नवीन आत्मचरित्रे अधिक प्रमाणिक जीवनाचे यथार्थ घडवू शकणारी अशी ठरत आहेत." अर्थात वा.ल. कुलकर्णी रूढार्थाने येणारी आत्मचरित्रे आणि दलित आत्मकथने यातील वेगळेपण स्पष्ट करतात. म्हणजेच दलित आत्मकथनातून न संपलेली सातत्याने चालणा-या जीवनाची दुःखाची गाथा व्यक्त होत असते हे स्पष्टच आहे.

प्रामुख्याने १९७० च्या नंतर आत्मकथन लेखनाला प्रारंभ झाला आणि या आत्मकथनांनी अत्यंत समृध्द परंपरा निर्माण झाली. समाज व्यवस्थेने सर्व स्तरावर समतेचे हक्क नाकारले आणि विषमतेने शोषण केले. पशुहुनही अत्यंत हीन वागणूक समाजाने दिली. स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा स्वतःची प्रगती, धनसंचयन करून सुस्कृत होण्याचा हक्कच नाकारला, सर्व अंगानी शोषण झालेल्या अनुभवांचे आणि वर्णाधिष्ठित व्यवस्थेने गुलामीचे जोणे जगावे लागलेल्या अनुभवांचे आलेख आत्मकथनांमधुन आविष्कृत केले आहेत. भुतकाळात भोगलेलं जीवन आणि वर्तमानात बदलणारे जीवन याचा आलेख दलित आत्मकथनांनी चितारला आहे. त्यामध्ये महार, मांग, चांभार ढोर, कैकाडी, भटक्या विमुक्त जमाती, कोल्हाटी इ. नानाविध दलित जाती जमातीमधुन आत्मकथन लिहिली गेली त्यामध्ये दया पवारांचे 'बलुतं', प्र.ई. सोनकांबळे 'आठवणीचे पक्षी', लक्ष्मण माने 'उपरा', लक्ष्मण गायकवाड 'उचल्या', माधव कोंडविलकर 'मुक्काम पोस्ट देवाचे

गोठने' रुस्तुम अचलखांब 'गावकी' भीमराव गरती 'बेरड, पार्थ पोकळे 'आभरान', दादासाहेब मोरे 'गबाळ', किशोर शांताबाई काळे 'कोल्हाट्याचं पोर', बेबी कांबळे 'जीणं आमचं', किशोर काळे 'चोरटा' अशा कितीतरी दलित आत्मकथनांनी संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्ट्या प्रस्थापित मराठी साहित्याचे नव्हे तर मानवतेचे क्षितिज रूंदवले आहे.

**समारोपः**

दलित आत्मकथनाचे स्वरूप आणि संकल्पनांचा विचार केला असता असे लक्षात येते की, दलितांच्या यातनामय जीवनाचे चित्रण करतांना ही वेदना प्रस्थापित व्यवस्थेने लादली असल्याचे सुचित करतात. तसेच दलितांची जीवनव्यवस्था हेच या आत्मकथनांच्या केंद्रस्थानी आहे. तसेच जीणे जगावे लागले. त्याचा भूतकालीन आढावा दलित आत्मकथने होतात. तसेच दलित आत्मबने ही परंपराने येणारे आत्मचरित्र लेखन नाकारून सातत्याने चालणा-या जीवनाची दुःखाची गाथा व्यक्त करतात. दलित आत्मकथा ही सामर्थ्य आणि विवेचनातून अधिक स्पष्ट होत असल्याचे सुचित करने सर्वात महत्त्वाचे की, दलित आत्मकथने ही अनुभवांच्या भोगांना समाज आणि वाचकापर्यंत सांांवयाची असते. एकुणच दलित आत्मकथनाचे स्वरूप आणि संकल्पना वाचकांना, आभ्यासकांना विचार प्रवृत्त करतात.

**संदर्भः**

१. पाटील अशोक, 'दलितांचे स्वथन', अनुसष्टुभ-धुळे, जेलै-ऑगस्ट १९९९, पृ.३१

२. मुलाटे वासुदेव, 'सहा दलित आत्मकथनेः एक चिंतन', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. १९८५, पृ.०३

३. भगत दत्ता, 'दलित साहित्यः दिशा आणि दिशांतर', अभय प्रकाशन, नांदेड, १९९२, ५.९९, १००

४. लिंबाळकर वामन, 'दलित साहित्यः स्वरूप व भूमिका', प्रबोधन प्रकाशन, नागपुर, १९८६, पृ.१०७

५. क-हाडे सदा, 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मयगृह, मुंबई, पृ.८५